| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## एम.ए. (Dramatics) (सत्र – I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः
## ऑक्टोबर/नोव्हेंबर – २०२५
## Introduction To Performing Arts (230124101)

वार, दिनांक : बुधवार, २९-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

१) नाटक, संगीत आणि नृत्य या ––– कला आहेत.
अ) प्रयोगशील ब) आशय
क) शांत ड) साहित्य

२) पाश्चात्य मान्यतानुसार ––– हा नाटकाचा आत्मा असतो.
अ) साहित्य ब) संघर्ष
क) प्रेक्षक ड) पैसा

३) चित्रकला आणि शिल्पकला यांना ––– म्हणतात.
अ) ललित कला ब) दृकश्राव्य कला
क) स्थिर कला ड) मिश्र कला

४) संगीत, नृत्य आणि नाट्य यांना ––– कला म्हटलं जातं.
अ) अगम्य ब) सहज
क) तत्त्वनिष्ठ ड) प्रयोगनिष्ठ

५) ऍरिस्टॉटलने ––– हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ लिहीला.
अ) काव्यशास्त्र ब) नाट्यशास्त्र
क) अ आणि ब ड) दोन्हीपैकी नाही

६) ––– हे ऍरिस्टॉटल चे गुरू होते.
अ) भरत मुनी ब) प्लेटो
क) कालिदास ड) अलेक्झांडर

७) सौंदर्यदृष्टी बरोबर ––– हे हस्तकलेच महत्त्वाचं लक्षण ठरतं.
अ) परिणामकारकता ब) अनुभव संपन्नता
क) उपयुक्तता ड) ध्येयनिष्ठता

८) कलांची निर्मिती ही प्रामुख्याने ––– साठी केली जाते.
   अ) संयुक्तते   ब) जीवनासक्ती
   क) भावना मुक्ती   ड) आशय अभिव्यक्ती

९) कोणत्याही कथानकाचे आकारमान ––– प्रकट करणारे असावे.
   अ) सौंदर्य   ब) थरार
   क) करार   ड) रंग

१०) माती दगड धातू ही ––– माध्यम आहेत.
   अ) संगीत कलेची   ब) शिल्पकलेची
   क) नाट्यकलेची   ड) नृत्य कलेची

११) ––– ही प्रत्येक कलेचा प्राण आहे.
   अ) प्रकाशित आवृत्ती   ब) स्वेच्छा निवृत्ती
   क) स्वयं स्फूर्ती   ड) परोपकारवृत्ति

१२) नाटकातील संघर्ष म्हणजे –––.
   अ) हिंसा   ब) कपट
   क) भांडण   ड) आंतरिक द्वंद्व

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

**अ)** दृश्यकला
**ब)** काव्यशास्त्र
**क)** अभिरूची
**ड)** लोककला
**इ)** स्वरज्ञान
**ई)** अनुभव

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** श्राव्य कलांचे महत्त्व विशद करा.
**ब)** नृत्य आणि सौष्ठव या विषयी माहिती लिहा.
**क)** रंग आणि घनता यांची परिणामकारकता लिहा.
**ड)** कला निर्मिती बद्दल थोडक्यात माहिती द्या.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** कलांचे समाजाच्या दृष्टीने महत्त्व स्पष्ट करा.
**ब)** दृकश्राव्य कलांविषयी लिहा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

प्रयोग कलांमधील वैविध्य आणि अंतर संबंध स्पष्ट करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Elements of Theatre & Play Production Process. (230124102)**

वार, दिनांकः शुक्रवार, ३१-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ रिकाम्या जागा भरा.** **१२**

१) नाटकाची निवड ते प्रयोग ही जबाबदारी ––– ची असते.
अ) रंगभूषाकार ब) वेशभूषाकार
क) दिग्दर्शक ड) नेपथ्यकार

२) नाटकातील काही दृश्यबदल सहज करण्यासाठी ––– दृश्यबंधाचा उपयोग होऊ शकतो.
अ) एकमुख ब) द्विमुख
क) त्रिमुख ड) चतुर्मुख

३) मंचवस्तूचे एकूण ––– प्रकार पडतात.
अ) दोन ब) चार
क) सहा ड) दहा

४) ––– पर्यंत रंगमंचावर लाईम लाईटचा उपयोग होत होता.
अ) १९१० ब) १९३०
क) १९५० ड) १९७०

५) नाटकाच्या तालमीचा ––– हा पहिला टप्पा किंवा अवस्था होय.
अ) वाचन ब) प्रवेश
क) अभिनयपद्धत ड) यापैकी नाही

६) प्रकाशाच्या रंगमाध्यमाचे ––– प्रकार पडतात.
अ) दोन ब) तीन
क) चार ड) पाच

**७)** ––– साठी मजेंटा, पांढरा व आकाशी रंग आणि लंबरेषांचा चांगला उपयोग होतो.
अ) सात्विक प्रवृत्तीच्या राजासाठी
ब) सेवकासाठी
ब) शेतकऱ्यासाठी
ड) व्यापाऱ्यासाठी

**८)** रंगभूषेपूर्वी कमीत कमी ––– तास आधी नटाने दाढी करावी.
अ) दोन ब) चार
क) तीन ड) पाच

**९)** विद्युत अवरोध तारेच्या लांबीच्या ––– असतो.
अ) विषम प्रमाणात ब) समप्रमाणात
क) दुप्पट ड) पाचपट

**१०)** गालावर चामखीळ किंवा मस दाखविणे हे ––– या रंगभूषेचे उदाहरण आहे.
अ) आभासी ब) त्रीपरिमित
क) रेषारूप ड) यापैकी नाही

**११)** नाटकाच्या एका अंकाचे ब्लॉकिंग करायला साधारणतः ––– ते ––– दिवस लागतात.
अ) तीन ते चार ब) दोन ते पाच
क) तीन ते पाच ड) पाच ते दहा

**१२)** रंगभूषेसाठी चेहऱ्याचे आडवे ––– समांतर कटिबंध पडतात.
अ) एक ब) दोन
क) तीन ड) चार

**प्र.२ टिपा लिहा (कोणत्याही चार)** १२

**अ)** अनुभवी व नामवंत कलाकारांवर अवलंबून असणारा दिग्दर्शक
**ब)** फिरता रंगमंच
**क)** नाटकाची रंगीत तालीम
**ड)** ध्वनी वस्तू
**इ)** त्रिपरिमित रंगभूषा
**ई)** आभासी रंगभूषेची दोन उदाहरणे द्या.

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** नाटकामध्ये मंचव्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करा.

**ब)** दृश्यबंध आयोजनात कोणत्या चार मूलभूत तत्त्वांचा विचार करावा लागतो?

**क)** प्रकाशाचे परावर्तन म्हणजे काय, सविस्तर माहिती द्या.

**ड)** नाट्यनिर्मितीत रंगभूषाकाराचे कार्य स्पष्ट करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** दृश्यबंध व रंगमंचाच्या प्रकारांपैकी कोणत्याही सहा प्रकारांविषयी सविस्तर चर्चा करा.

**किंवा**

**ब)** नाटकासाठी आवश्यक असणारे रंगभूषाकाराचे कार्य व रंगभूषेचे महत्त्व सविस्तरपणे स्पष्ट करा.

**प्र.५ दीर्घोत्तरी प्रश्न** १२

सर्जनशील दिग्दर्शकाची वैशिष्ट्ये सविस्तरपणे वर्णन करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set** | **P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर/नोव्हेंबर – २०२५**
**Classical Indian Theatre (230124106)**

वार, दिनांकः सोमवार, ०३-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) भारती ही वृत्ती ––– निगडित वृत्ती आहे.
अ) भरतमुनींशी ब) भारत देशाशी
क) भाषेशी ड) भाराशी

२) ––– ३६ अध्यायांमध्ये विभागलेला ग्रंथ आहे.
अ) नाट्यदर्पण ब) अभिनय दर्पण
क) नाट्यशास्त्र ड) काव्यशास्त्र

३) लंकादहनाची कथा ––– रसाने व्यक्त होते.
अ) शांत ब) अद्भुत
क) वीर ड) हास्य

४) नायिकांचे स्वभाव गुणधर्मानुसार ––– भेद सांगितले आहेत.
अ) २४ ब) १६
क) ०८ ड) ०२

५) नाट्यशास्त्रामध्ये अभिनयाचे वर्गीकरण एकूण ––– प्रकारात केले आहे.
अ) 4 ब) १६
क) यापैकी नाही ड) यापैकी सर्व

६) लोकधर्मी अभिनय म्हणजे –––.
अ) ज्या धर्माचे प्रेक्षक आहेत त्या धर्माचे नाटक करणे
ब) ज्या देशात प्रयोग आहे त्या धर्माचे नाटक करणे
क) सहज सोपा अभिनय
ड) निधर्मी होऊन केलेला अभिनय

७) कैशिकी ही वृत्ती ––– निगडित वृत्ती आहे.
अ) कौशिक ऋषींशी ब) केसांशी
क) नृत्याशी ड) भाराशी

८) ––– हा नंदिकेश्वरांनी लिहिलेला ग्रंथ आहे.
अ) नाट्यदर्पण ब) अभिनय दर्पण
क) नाट्यशास्त्र ड) काव्यशास्त्र

९) सिंहगडाची कथा ––– रसाने व्यक्त होते.
अ) शांत ब) अद्भुत
क) वीर ड) हास्य

१०) नायकांचे स्वभाव गुणधर्मानुसार ––– भेद सांगितले आहेत.
अ) १६ ब) ०८
क) ०४ ड) ०२

११) अलंकार, आभूषणे हे ––– अभिनयात मोडतात.
अ) भारी ब) शाब्दिक
क) आहार्य ड) आंगिक

१२) नाट्यधर्मी अभिनय म्हणजे –––.
अ) विचित्र अभिनय करणे ब) मंचावर येऊन अभिनय करणे
क) शैलीदार अभिनय ड) परधर्मी होऊन केलेला अभिनय

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

**अ)** भाव
**ब)** महावीर चरित्
**क)** कालिदास
**ड)** शूद्रक
**इ)** नायक
**ई)** अष्ट नायिका

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** लोकधर्मी आणि नाट्यधर्मी अभिनयाबद्दल माहिती लिहा.
**ब)** नायकाचे प्रकार लिहा.
**क)** दशरूपकातील भाण, इहामृग, समावकार, प्रहसन हया रूपकांची माहिती लिहा.
**ड)** मंडप रचना याविषयी माहिती सविस्तर लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** भरतमुनींच्या रससिद्धांताविषयी लिहा.

**ब)** संस्कृत नाट्यसृष्टी विशद करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

कालिदासांच्या नाटकांविषयी लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## एम.ए. (Dramatics) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:
## ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
## Sanskrit Natya Parampara (230124108)

वार, दिनांकः सोमवार, ०३-११-२०२५ कमाल गुणः ६०

वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) इ.स.पू. ––– ते ––– हा भारतीय वेदांचा निर्मिती काळ मानला जातो.
अ) १००० ते ५०० ब) १५०० ते १२००
क) १००० ते ९०० ड) १५०० ते १०००

२) संस्कृत नाटकांच्या सादरीकरणाचे तंत्र अतिशय विशुद्ध व ––– होते.
अ) अप्रगत ब) प्रगत
क) विखूरलेले ड) यापैकी नाही

३) ––– हा संस्कृत नाटयपरंपरेतील आदय नाटककार मानला जातो.
अ) भास ब) कालिदास
क) भवभूती ड) शुद्रक

४) संस्कृत नाटकांचे ––– प्रकार पडतात.
अ) सात ब) आठ
क) नऊ ड) दहा

५) दशरूपकात ––– ही रूपकाची सर्वात उन्नत अवस्था मानली जाते.
अ) समवकार ब) डिम
क) व्यायोग ड) नाटक

६) ––– हा संघर्षहीन सात्वीक मनाचा नाटकातील अभिनय अविष्कार मानला जातो.
अ) आरभारी वृत्ती ब) कैसीकी वृत्ती
क) सात्वत्ती वृत्ती ड) भारती वृत्ती

७) अभिजात ––– नाटक हे गायन वादन व नर्तनाने अलंकृत केलेले नाटक होते.
अ) ग्रीक ब) रोमन
क) जपानी ड) संस्कृत

८) ‘पंचरात्र’ हे तीन अंकी नाटक ––– यांचे आहे.
अ) कालिदास ब) भास
क) विशाखादत्ता ड) शुद्रक

९) ‘अभिज्ञान शाकुंतल’ हे ––– यांचे अजरामर नाटक आहे.
अ) भास ब) कालिदास
क) भवभूती ड) विशाखादत्ता

१०) शुद्रकाचे ‘मृच्छकटिक’ हे भारतीय रंगपरंपरेतील पहिले ––– नाटक आहे.
अ) आर्थिक ब) राजकीय
क) सामाजिक ड) सांस्कृतिक

११) ––– हा संस्कृत रंगभूमीवरील मनस्वी नाटककार आहे.
अ) विशाखादत्ता ब) भास
क) शुद्रक ड) भवभूती

१२) ––– हे नाटक म्हणजे भारतीय रंगभूमीवरील शोकात्म भावाचे नाटक होय.
अ) मृच्छकटिक ब) अभिज्ञान शाकुंतल
क) पंचत्रात्र ड) उत्तर रामचरित

**प्र.२ थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही चार)** १२
**अ)** वृत्ती म्हणजे काय, स्पष्ट करा.
**ब)** ‘दशरूपक’ ही संज्ञा स्पष्ट करा.
**क)** आरभारी वृत्ती म्हणजे काय?
**ड)** भासाच्या नाटकातील आधूनिकता स्पष्ट करा.
**इ)** महाकवी कालिदासांविषयी थोडक्यात लिहा.
**ई)** कैसिकी वृत्ती म्हणजे काय?

**प्र.३ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२
**अ)** संस्कृत नाटयपरंपरा सविस्तरपणे स्पष्ट करा.
**ब)** संस्कृत रंगभूमीची अवनती सविस्तरपणे मांडा.
**क)** मालती – माधव या कल्पनारम्य प्रेमकथेविषयी माहिती लिहा.
**ड)** ‘स्वप्नवासवदत्ता’ या नाटकाविषयी सविस्तर चर्चा करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२
**अ)** संस्कृत रंगभूमीवरील नाटककार शुद्रकाच्या ‘मृच्छकटीक’ नाटकाविषयी सविस्तर चर्चा करा.

**किंवा**

**ब)** ‘मालविकाअग्निमित्र’ या महाकवी कालिदासांच्या नाटकाविषयी सविस्तर चर्चा करा.

**प्र.५ सविस्तर उत्तरे लिहा.** १२

भासाला संस्कृत रंगभूमीवरील आदय नाटककार का मानले जाते हे सांगून भासाच्या प्रमुख नाटकांविषयी सविस्तर चर्चा करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र - I) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Research Methodology In Dramatics (230124105)**

वार, दिनांकः गुरूवार, ०६-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) ––– तो संशोधन करू शकतो.
अ) ज्याने संशोधन पद्धतींचा अभ्यास केला आहे
ब) ज्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे
क) ज्याच्याकडे शैक्षणिक आणि वैचारिक क्षमता आहेत
ड) ज्याची मेहनत करण्याची तयारी आहे

२) संशोधनाचे उद्दिष्ट प्रबंधाच्या ––– प्रकरणापासून सुरू होते.
अ) पहिल्या ब) तिसऱ्या
क) पाचव्या ड) सातव्या

३) संशोधकाकडे उत्तम ––– क्षमता असणे गरजेचे आहे.
अ) निरीक्षण करण्याची ब) विश्लेषणात्मक
क) सर्वेक्षण करण्याची ड) इतिहासाचा अभ्यास करण्याची

४) ––– संशोधनाची पहिली पायरी असे म्हणतात.
अ) समस्येचा शोध ब) समस्येचे मूळ
क) समस्येची ओळख ड) यापैकी नाही

५) गोपनियता आणि प्रतिवादीच्या निनावी पणाची खात्री दिली नाही तर ––– भंग होतो.
अ) समस्येचा ब) नैतीकतेचा
क) समस्येच्या मूळाचा ड) समस्येची ओळख होण्याचा

६) ––– दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रीत पणे काम करू शकतात.
अ) समस्येवर ब) व्याख्यानावर
क) प्रबंधावर ड) शोध निबंधावर

७) ––– सर्वेक्षण करणे ही संशोधनाची पहिली पायरी नसते.

अ) समस्यांचे	ब) लोकांचे

क) साहित्याचे	ड) प्रबंधाचे

८) संशोधन विषयाची निवड करताना प्रामुख्याने ––– विचार केला जातो.

अ) संशोधकाच्या आवडीचा

ब) आर्थिक मदतीचा

क) समस्येच्या सामाजिक संबंधाचा

ड) संबंधित विषयाच्या उपलब्ध साहित्याचा

९) संशोधन हे ––– असावे.

अ) परिवर्तनीय	ब) अपरिवर्तनीय

क) साधे	ड) यापैकी नाही

१०) ––– करताना व्यापक दृष्टिकोन असावा.

अ) सर्वेक्षण	ब) अभ्यास

क) चिंतन	ड) संशोधन

११) समस्येचे ––– नेमके असावे.

अ) शिर्षक	ब) विषय

क) अनुमान	ड) अंदाज

१२) संशोधनासाठी जो सम्पुर्ण समूह निवडला जातो त्याला ––– म्हणतात.

अ) मर्मसंख्या	ब) जनसंख्या

क) मनसंख्या	ड) असंख्या

**प्र.२ खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** संशोधन प्रस्तावामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा?

**ब)** विषयाची निवड करताना कोणत्या बाबींचा विचार करावा लागतो?

**क)** प्रबंध आणि शोध निबंध हयातील फरक स्पष्ट करा.

**ड)** संशोधन प्रक्रियेमधील मार्गदर्शकाचे महत्त्व स्पष्ट करा.

**इ)** संशोधनाचा दर्जा राखण्यासाठी कोणत्या बाबींची काळजी घेणे आवश्यक असते?

**ई)** संशोधन प्रक्रियेमधील आर्थिक संयोजनाविषयी माहिती लिहा.

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** मुलभूत साधनांमध्ये कोणत्या बाबींचा समावेश होतो?

**ब)** संशोधनातील महत्त्वाच्या टप्प्यांचे स्वरूप विषद करा.

**क)** व्याकरण आणि शुद्धलेखन हयांचे संशोधनातील स्थान काय असते?

**ड)** प्रबंध लिखाणातील ''करू नयेत'' अशा गोष्टींची माहिती सांगा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** ‘संशोधन ही एक सामाजिक जबाबदारी आहे.’ हया संज्ञेचे विवेचन करा.

**ब)** नैतिकता आणि अनैतिकता हयांचे सोदाहरण परिणाम स्पष्ट करा.

**प्र.५ दीर्घ उत्तर लिहा.** १२

संगीत नाट्यक्षेत्रामध्ये संशोधन करताना कोणकोणत्या पायऱ्यांचा अवलंब केला जातो?

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र - II) (New) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**History of Theatre (Asian and European) (230124201)**

वार, दिनांक : मंगळवार, २८-१०-२०२५ — कमाल गुण: ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) शूद्रकाचे ––– हे नाटक अविस्मरणीय नाटक आहे.
अ) उत्तर रामचरित ब) विक्रमोवर्शिय
क) स्वप्नवासवदत्ता ड) मृच्छकटिक

२) संस्कृत नाटकाच्या सादरीकरणाचे व्याकरण म्हणजे भरतमुनींचे ––– होय.
अ) भगवदगीता ब) नाट्यशास्त्र
क) महाभारत ड) संगीतशास्त्र

३) नो – नाट्याच्या संहितांना ––– म्हणतात.
अ) मृदव ब) नालिका
क) उटाईबाँन ड) व्यवहार

४) हसत हसत गुडार्थयुक्त भाषण करणे यास ––– म्हणतात.
अ) व्यवहार ब) नालिका
क) उटाईबाँन ड) मृदव

५) ––– हा ग्रीक रंगभूमीवरील पहिला नाटककार व नट ठरतो.
अ) थेप्सीस ब) टेरेन्स
क) प्लॉट्स ड) शेक्सपियर

६) नाट्य सादरीकरणाच्या विविध शैली म्हणजे ––– होय.
अ) शक्ती ब) वृत्ती
क) रूपक ड) रस

७) डीम या रूपकात एकूण ––– नायक असतात.
अ) १० ब) १२
क) १५ ड) १६

८) सॉफक्लीज हा ——— रंगभूमीवरील नाटककार आहे.
अ) रोमन ब) मराठी
क) अमेरिकन ड) ग्रीक

९) प्रहसनाचे एकूण ——— पोटभेद मानले जातात.
अ) चार ब) सहा
क) आठ ड) तीन

१०) प्लॉट्स हा ——— रंगभूमीवरील पहिला नाटककार होय.
अ) रोमन ब) मराठी
क) अमेरिकन ड) ग्रीक

११) ——— हा एलिझाबेथनकालीन नाटककार आहे.
अ) थेप्सीस ब) टेरेन्स
क) प्लॉट्स ड) शेक्सपियर

१२) टेरेन्स हा ——— रंगभूमीवरील नाटककार आहे.
अ) रोमन ब) मराठी
क) अमेरिकन ड) ग्रीक

**प्र.२ टिपा लिहा. (कोणतेही चार)** १२
**अ)** संकीर्ण प्रहसन
**ब)** ग्रीक नाटककार युरीपीडिझ
**क)** कैसीकी वृत्ती
**ड)** रोमन नाटककार – टेरेन्स
**इ)** मॅक्स नाट्यप्रकार
**ई)** अंक रूपक

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२
**अ)** एलिझाबेथकालीन नाट्यगृहाविषयी सविस्तर चर्चा करा.
**ब)** कॉमेदीया–डेल–आर्ते चे सादरीकरण कसे केले जाते?
**क)** एलिझाबेथन रंगभूमीचा अस्त कशाप्रकारे झाला?
**ड)** नो–नाट्यातील नेपथ्य, वेशभूषा व नट यांविषयी माहिती लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२
**अ)** रोमन रंगभूमी विषयी विविध मुद्दयांद्वारे चर्चा करा.

**किंवा**

**ब)** मॅकबेथ नाटकाविषयी माहिती देऊन शेक्सपियरच्या नाटकांची वैशिष्ट्ये सांगा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

एलिझाबेथकालीन रंगभूमी विषयी माहिती देऊन विल्यम शेक्सपियर यांच्या हॅम्लेट नाटकाविषयी चर्चा करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Dramatics) (सत्र – II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# Marathi Theatre (230124202)

वार, दिनांक : गुरूवार, ३०-१०-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) ––– रंगभूमी ही अत्यंत प्रगत स्वरूपाची प्रादेशिक रंगभूमी आहे.
अ) रोमन ब) ग्रीक
क) मराठी ड) अमेरिकन

२) ––– हे नाटक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे आहे.
अ) विद्याहरण ब) वहिनी
क) विषवृक्षाची छाया ड) मतिविकार

३) १८९९ साली ––– या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
अ) संगीत शारदा ब) दमयंती
क) कांचनगडची मोहना ड) पाणीग्रहण

४) ––– हे नाटक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे आहे.
अ) संगीत शारदा ब) पुण्यप्रभाव
क) विद्याहरण ड) मृच्छकटिक

५) ––– हे नाटक राम गणेश गडकरी यांचे आहे.
अ) वहिनी ब) दशावतार
क) पुण्य प्रभाव ड) वाडा चीरेबंदी

६) २६ नोव्हेंबर १८५३ साली विष्णुदास भावे यांनी ––– या नाटकाचा प्रयोग अद्ययावत ग्रॉटरोड थिएटर या ठिकाणी सादर केला.
अ) राजा हरिश्चंद्र ब) राजा गोपीचंद
क) कुंजविहारी ड) वधू परीक्षा

७) ––– हे नाटक प्रल्हाद केशव अत्रे यांचे आहे.
अ) राजा हरिश्चंद्र ब) राजा गोपीचंद
क) कांचनगडची मोहना ड) पाणीग्रहण

८) ––– हे नाटक मोतीराम गजानन रांगणेकर यांचे आहे.
अ) विद्याहरण ब) वहिनी
क) विषवृक्षाची छाया ड) मतिविकार

९) विषवृक्षाची छाया हे ––– यांचे नाटक आहे.
अ) राम गणेश गडकरी ब) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
क) गोविंद बल्लाळ देवल ड) वसंत कानेटकर

१०) गोविंद बल्लाळ देवल यांचे ––– हे नाटक आहे.
अ) संगीत शारदा ब) पुण्यप्रभाव
क) विद्याहरण ड) मृच्छकटिक

११) ––– यांनी मराठी रंगभूमीवर प्रायोगिक नाटकांची मुहूर्तमेढ रोवली.
अ) वसंत कानेटकर ब) विजय तेंडुलकर
क) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ड) मामा वरेरकर

१२) वाडा चिरेबंदी हे नाटक ––– यांचे आहे.
अ) महेश एलकुंचवार ब) श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
क) गोविंद बल्लाळ देवल ड) वसंत कानेटकर

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२
**अ)** श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नाटकांची नावे
**ब)** नाटक – लग्नाची बेडी
**क)** नाटक – कन्यादान
**ड)** नाटक – महापूर
**इ)** देवल युग
**ई)** अत्रे – रांगणेकरांचे मराठी रंगभूमीवरील योगदान

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२
**अ)** कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे व्यावसायिक मराठी रंगूभूमीवरील कार्य सविस्तरपणे मांडा.
**ब)** प्रायोगिक मराठी रंगभूमीवरील सतीश आळेकर यांचे कार्य विशद करा.
**क)** 'आंधळ्यांची शाळा' हे नाटक व्यावसायिक मराठी रंगभूमीवर सादर करण्याचा हेतू स्पष्ट करा.
**ड)** राम गणेश गडकरी यांचे व्यावसायिक मराठी रंगभूमीवरील योगदान स्पष्ट करा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२
**अ)** प्रायोगिक मराठी रंगभूमीचा इतिहास सांगून नाटककारांची नावे लिहा.
**ब)** विजय तेंडुलकर यांची नाटकाविषयीची प्रायोगिकता स्पष्ट करून त्यांच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाविषयी सविस्तर चर्चा करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

प्रायोगिक मराठी रंगभूमीवरील सतीश आळेकर यांची ‘अद्‌भूत नाट्यत्रयी’ सविस्तरपणे मांडा.

# SLR-DO-9

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## एम.ए. (Dramatics) (सत्र - II) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
## Direction (230124206)

वार, दिनांकः शनिवार, ०१-११-२०२५ — कमाल गुणः ६०

वेळः सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** — १२

१) दिग्दर्शकीय दृष्ट्या खाडिलकर आणि गडकऱ्यांची नाटके ––– या शैलीत सादरीकरणासाठी योग्य आहेत.
अ) रूप वाद — ब) प्रारूप वाद
क) विधायक वाद — ड) पुराण वाद

२) नागर रंगभूमीवरील नाट्यकथांचा स्त्रोत मुख्यतः ––– असतो.
अ) रामायण महाभारत — ब) आधुनिक कथा
क) कौटुंबिक — ड) कलह प्रधान

३) दिग्दर्शकाचा नाटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ––– असतो.
अ) सापेक्ष — ब) निरपेक्ष
क) व्यक्तिनिष्ठ — ड) कर्मनिष्ठ

४) जीवनातील व्यर्थतेची जाणीव उपभोगवादी युरोपीय माणसाला एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी झाली. या जाणीवेतून ––– ही शैली उद्भवली.
अ) सत्यवाद — ब) मिथ्यावाद
क) असत्यवाद — ड) नित्य वाद

५) ऐतिहासिक नाटक बसवताना ––– विपर्यास झाला नाही ना हे पडताळले पाहिजे.
अ) विश्वासाचा — ब) सत्याचा
क) समाजाचा — ड) दिग्दर्शनाचा

६) दिग्दर्शकाला नाटकाचे ––– करता येणे आवश्यक आहे.
अ) वाचन — ब) मनन
क) अर्थघटन — ड) विघटन

**७)** ––– नवनवीन फॉर्म्सच्या शोधात दिग्दर्शकाने नेहमी राहिले पाहिजे.
अ) अभिव्यक्तीच्या ब) कलाकारांच्या
क) पुस्तकांच्या ड) प्रेक्षकांच्या

**८)** दिग्दर्शकाला रंगमंचाचा ––– माहिती असणे आवश्यक आहे.
अ) विज्ञान ब) इतिहास
क) विषय ड) भूगोल

**९)** छोट्या छोट्या गावांत किंवा हौशी नाट्यमंडळात ––– पद्धतीचे दिग्दर्शक आढळतात.
अ) अनुभवी ब) व्यावसायिक
क) रबरस्टॅम्प ड) हौशी

**१०)** मंच व्यवस्थापक हा ––– भमिका पार पाडतो.
अ) सहदिग्दर्शकाची ब) सूत्रधाराची
क) व्यवस्थापकाची ड) दिग्दर्शकाची

**११)** मार्क्सवादी जाणिवा जागृत करणारा दिग्दर्शक म्हणून ––– ओळखले जाते.
अ) ब्रेख्तला ब) स्टॅनिस्लावास्कीला
क) हेन्री जोसेफला ड) इबसेनला

**१२)** नट दिग्दर्शक हा दिग्दर्शक ––– अस्तित्वात आहे.
अ) रंगभूमीच्या अगदी आरंभ कालापासून
ब) एकोणिसाव्या शतकापासून
क) दुसऱ्या महायुद्धापासून
ड) २१ व्या शतकापासून

**प्र.२ टिपा लिहा (कोणत्याही चार)** १२

**अ)** रंग नोंदी
**ब)** तंत्रज्ञ दिग्दर्शक
**क)** रंगावृत्ती
**ड)** मंच व्यवस्थापक
**इ)** संघ निवड
**ई)** वाचन

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** 'दिग्दर्शक हा जहाजाचा कप्तान असतो' वाक्यप्रयोग स्पष्ट करा.
**ब)** चक्री वाचनाचे स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करा.
**क)** दिग्दर्शक आणि नटसंच यांची एकत्रित कार्यपद्धती स्पष्ट करा.
**ड)** नाट्यसमूहाचे संहिता ते प्रयोग संशोधन स्पष्ट करा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** दिग्दर्शकाची जबाबदारी स्पष्ट करा.

**किंवा**

**ब)** दिग्दर्शकाचा व्यक्ती चित्रणाचा अभ्यास स्पष्ट करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

पौराणिक नाटक बसवताना दिग्दर्शकाच्या जबाबदाऱ्या काय असतात सोदाहरण स्पष्ट करा.

**SLR-DO-12**

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Dramatics) (सत्र – III) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# Modern World Theatre &Theatre Methodology (230124301)

वार, दिनांक : बुधवार, २९-१०-२०२५ — कमाल गुण: ६०

वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) इंग्लंड मधील पहिले पब्लिक नाटयगृह ––– साली तयार झाले.
अ) १५५०  ब) १५७५
क) १५७६  ड) १५७७

२) कॉमेडी ऑफ एरर ही ––– यांची सुखात्मिका आहे.
अ) टेनिसि विल्यम्स  ब) हेन्रिक इब्सन
क) शेक्सपियर  ड) ऑर्थर मिलर

३) डेथ ऑफ अ सेल्समन हे नाटक ––– यांचे आहे.
अ) युजीन ओनिल  ब) ग्रोटोव्हस्की
क) शेक्सपियर  ड) ऑर्थर मिलर

४) आधुनिक शोकनाटयाचे जनक म्हणून ––– यांना ओळखले जाते.
अ) टेनिसि विल्यम्स  ब) हेन्रिक इब्सन
क) शेक्सपियर  ड) ऑर्थर मिलर

५) ––– मधील पहिल्या पब्लिक नाटयगृहाचे नाव ‘द थिएटर’ हे होते.
अ) अमेरिका  ब) युरोप
क) जपान  ड) इंग्लंड

६) बीयोंड दी होरायझन या नाटकाचा पहिला प्रयोग ––– साली झाला.
अ) १९८०  ब) १९३०
क) १९२०  ड) १९५०

७) शेक्सपिअरच्या नाटकांची मुख्यता ––– भागात विभागणी केली जाते.
अ) ३  ब) ५
क) ६  ड) ४

८) द प्राईज हे नाटक ––– यांचे आहे.
अ) ऑर्थर मिलर
ब) ग्रोटोव्हस्की
क) शेक्सपियर
ड) ऑर्थर मिलर

९) मिस जुली हे नाटक ––– यांचे आहे.
अ) ऑर्थर मिलर
ब) स्टीनबर्ग
क) शेक्सपियर
ड) ऑर्थर मिलर

१०) मच एडो अबाउट नथिंग ही ––– यांची सुखात्मिका आहे.
अ) टेनिसि विल्यम्स
ब) हेन्रिक इब्सन
क) शेक्सपियर
ड) ऑर्थर मिलर

११) व्हेन वी डेड अवेकन हे नाटक ––– यांचे आहे.
अ) टेनिसि विल्यम्स
ब) ग्रोटोव्हस्की
क) शेक्सपियर
ड) हेन्रिक इब्सन

१२) एपिक थिएटर मध्ये प्रेक्षकाचा तटस्थभाव जागे करण्याच्या तंत्राला ––– म्हणतात.
अ) एलिनीएशन टेक्निक
ब) प्रकाश योजना
क) रंगसंगती
ड) यापैकी नाही

**प्र.२ टिपा लिहा. (कोणतेही चार)** १२
**अ)** अब्सर्ड नाटकांचा उगम
**ब)** सॅम्युअल बॅकेट यांचे अँड गेम नाटक
**क)** इब्सनच्या नाटकातील पात्रवैशिष्टये
**ड)** टेनिसि विल्यम्स
**इ)** अँटोन चेकॉव्ह
**ई)** टेनिस विल्यम्सची नाटयशैली

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२
**अ)** ग्रोटोव्हस्कीची पवित्र नटासाठीची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करा.
**ब)** एपिक थिएटर वरील पुनरावृत्तकरण ही संज्ञा स्पष्ट करा.
**क)** पिलर्स ऑफ सोसायटी या हेनरिक इब्सनच्या नाटकाविषयी चर्चा करा.
**ड)** युजीन ओनील यांचे नाटयतंत्र सविस्तरपणे मांडा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२
**अ)** सॅम्युअल बॅकेट यांचे वेटिंग फॉर गोदो हे नाटक जगप्रसिद्ध होण्यामागची कारणमीमांसा स्पष्ट करा.
**ब)** टेनिसि विल्यम्सची नाटयशैली व आशय विषय सविस्तरपणे लिहा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

टेनिसि विल्यम्स यांच्या कोणत्याही दोन नाटकांविषयी चर्चा करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Dramatics) (सत्र - III) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# Asthetics of Classical Indian Theatre (230124303)

वार, दिनांक: शुक्रवार, ३१-१०-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

१) नाटकाचा प्रधान रस शृंगार किंवा ––– असतो.
अ) हास्य ब) बीभत्स
क) वीर ड) करुण

२) नाट्यशास्त्रात एकूण ––– प्रकारच्या धर्मी आढळतात.
अ) ४ ब) ५
क) २ ड) ८

३) त्रस्त नाट्यगृहाचे एकूण ––– भेद पडतात.
अ) २ ब) ५
क) ३ ड) ९

४) भारती वृत्तीमध्ये भाषेच्या ––– अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.
अ) वाचनास ब) संभाषणास
क) उच्चारणास ड) सादरीकरणास

५) भरतमुनींनी ––– या अभिनयात पाठ्यंगाचे सहा भेद सांगितलेले आहेत.
अ) अंगीक ब) वाचिक
क) आहार्य ड) सात्विक

६) नाटिका या उपरूपकाची रचना नाटक आणि ––– या दोन रूपकांच्या संकरातून झाली आहे.
अ) संज्ञा ब) प्रकरण
क) भाव ड) भेद

**७)** ––– अभिनयातील अलंकार या प्रकारात शरीर सुशोभित करणाऱ्या सर्व बाबींचा समावेश होतो.

अ) अंगीक ब) वाचिक
क) आहार्य ड) सात्विक

**८)** रंगमंचावर शैलीबद्ध चालणे म्हणजे ––– होय.

अ) गती ब) वृत्ती
क) भेद ड) रूपक

**९)** वृत्ती म्हणजे नायक, कथावस्तू आणि रस यांच्या संबंधातील क्रिया कलापांच्या ––– होय.

अ) शैली ब) गती
क) अभिनय ड) वृत्ती

**१०)** ––– एकूण चार प्रकार पडतात.

अ) रूपक ब) रस
क) अभिनय ड) यापैकी नाही

**११)** वृत्तीचे एकूण ––– प्रकार पडतात.

अ) २ ब) ५
क) ४ ड) ६

**१२)** ––– हा रस कृष्णवर्णाचा आहे.

अ) अद्‌भुत ब) शृंगार
क) हास्य ड) वीर

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** १२

**अ)** भारती वृत्ती
**ब)** मुखज अभिनय
**क)** आहार्य अभिनयातील 'पुस्त' हा प्रकार
**ड)** भयानक रस
**इ)** अद्‌भुत रस
**ई)** नाट्यधर्मी

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** रस म्हणजे काय हे सांगून करुण रसाबद्दल माहिती लिहा.
**ब)** आहार्य अभिनयातील 'अंगरचना' हा प्रकार स्पष्ट करा.
**क)** आहार्य अभिनय म्हणजे काय, हे सविस्तरपणे मांडा.
**ड)** रस म्हणजे काय हे सांगून वीर रसाबद्दल माहिती लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** आहार्य अभिनय म्हणजे काय, हे सांगून आहार्य अभिनयाचे चार प्रकार सविस्तरपणे मांडा.

**ब)** नाट्यशास्त्रातील लोकधर्मी आणि नाट्यधर्मी यातील फरक स्पष्ट करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

अंगीक, वाचिक, आहार्य व सात्विक हे अभिनयाचे चार प्रकार स्पष्ट करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र - III) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Marathi Playwrites 1960 - 80 (230124306)**

वार, दिनांकः सोमवार, ०३-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) गड गेला पण सिंह जागा झालाचे लेखक ———.
अ) पु. ल. देशपांडे ब) जयंत पवार
क) पुरूषोत्तम दारव्हेकर ड) वसंत कानेटकर

२) कन्यादान हया नाटकाचे नाटककार ———.
अ) गो. पु. देशपांडे ब) मधुकर तोरडमल
क) वसंता आचरेकर ड) विजय तेंडुलकर

३) जॉर्ज बर्नार्ड शॉ यांची ''पिगमेलियन' ही नाट्यकृती मराठीमध्ये ——— या नावाने अनुवादित आहे.
अ) ती फुलराणी ब) वाऱ्यावरची वरात
क) बटाट्याची चाळ ड) गगनभेदी

४) 'तुका म्हणे आता' नाटकाचे लेखक ———.
अ) वसंत कानेटकर ब) महेश एलकुंचवार
क) पु.ल.देशपांडे ड) विजय तेंडुलकर

५) ——— हे पु.ल.देशपांडे यांचे भाषांतरीत प्रसिद्ध नाटक आहे.
अ) चूक भूल ब) मामलेदार
क) चौकट राजा ड) राजा ईडिपस

६) ——— ही पु. ल. देशपांडे यांची गाजलेली एकांकिका आहे.
अ) पुढारी पाहिजे ब) वगसम्राट
क) हास्यसम्राट ड) बादशाह कसा झाला

७) गिधाडे या नाटकाचे लेखक ———.
अ) पुरूषोत्तम दारव्हेकर ब) विजय तेंडुलकर
क) पु. ल. देशपांडे ड) गो. ब. देवल

८) बाळ कोल्हटकर यांचे ——— हे महत्त्वाचे नाट्य लिखाण आहे.
अ) मुंबईची माणसे ब) जळीत कांड
क) वासनाकांड ड) थोतांड

९) बाबा हरवले आहेत ही ——— यांची बाल नाट्यकृती आहे.
अ) बाळ कोल्हटकर ब) हेमंत एदलाबादकर
क) महेश एलकुंचवार ड) विजय तेंडुलकर

१०) ——— ही आळेकरांची नाट्यकृती आहे.
अ) महापुरूष ब) मिकी आणि मेमसाब
क) बडीबेगम ड) भल्या दिलाचा माणूस

११) जिथे गवतास भाले फुटतात हे ——— यांचे प्रसिद्ध नाटक आहे.
अ) वसंत कानेटकर ब) विजय तेंडुलकर
क) आचार्य अत्रे ड) सतीश आळेकर

१२) घाशीराम कोतवाल या नाट्यकृतीचे लेखक ———.
अ) विजय तेंडुलकर ब) विष्णू वामन शिरवाडकर
क) गो. पु. देशपांडे ड) आचार्य अत्रे

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** **१२**
**अ)** सखाराम बाइंडर
**ब)** मित्राची गोष्ट
**क)** तुझे आहे तुजपाशी
**ड)** तीन पैशांचा तमाशा
**इ)** देव दिनाघरी धावला
**ई)** रायागडाला जेव्हा जाग येते

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **१२**
**अ)** अत्रे यांच्या नाटकातील समस्या सुत्रण याविषयी लिहा.
**ब)** शांतता कोर्ट चालू आहे नाटकाविषयी लिहा.
**क)** शनिवार रविवार नाटकाच्या लेखन शैलीविषयी लिहा.
**ड)** नाटककार आचार्य अत्रे यांच्या नाट्य शैलीतील वेगळेपण सिद्ध करा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** **१२**
**अ)** पु. ल. देशपांडे यांच्या आधारित नाट्यकृतींविषयी लिहा.
**ब)** नाटककार सतिश आळेकर यांच्या नाटकांविषयी लिहा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** **१२**
दारव्हेकरांच्या नाट्यसृष्टीचा आढावा घ्या.

**SLR-DO-15**

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## एम.ए. (Dramatics) (सत्र - III) (नवीन) (NEP CBCS) Examination: October/November - 2025
## Marathi Playwrites 1980- 2000 (230124307)

वार, दिनांकः सोमवार, ०३-११-२०२५ कमाल गुणः ६०

वेळः सकाळी ११:०० ते ०१:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन हया दीर्घांकाचे लेखक ———.
अ) पु. ल. देशपांडे ब) जयंत पवार
क) पुरूषोत्तम दारव्हेकर ड) मामा वरेरकर

२) आश्चर्य नंबर दहा हया नाटकाचे नाटककार ———.
अ) गो. पु. देशपांडे ब) मधुकर तोरडमल
क) वसंता आचरेकर ड) विजय तेंडुलकर

३) हेरॉल्ड पिंटर यांची ''द डंब वेटर'' ही नाट्यकृती मराठीमध्ये 'सुपारी' या नावाने ——— यांनी अनुवादित केले.
अ) सतीश आळेकर ब) मधुकर तोरडमल
क) पु. ल. देशपांडे ड) वि. वा. शिरवाडकर

४) 'झुंज' नाटकाचे लेखक ———.
अ) जयंत पवार ब) महेश एलकुंचवार
क) मधुकर तोरडमल ड) सतीश आळेकर

५) ——— हे जयवंत दळवी यांचे प्रसिद्ध नाटक आहे.
अ) चूक भूल ब) कालचक्र
क) चौकट राजा ड) संज्या छाया

६) ——— ही महेश एलकुंचवार यांची गाजलेली एकांकिका आहे.
अ) सुलतान ब) सम्राट
क) वगसम्राट ड) बादशाह

७) दोघांमधले नाते नाटकाचे लेखक ———.
अ) पुरूषोत्तम दारव्हेकर ब) शं. ना. नवरे
क) पु. ल. देशपांडे ड) गो. ब. देवल

**८)** महेश एलकुंचवार यांचे ——— हे महत्त्वाचे नाट्य लिखाण आहे.
अ) अश्रूंची झाली फुले  ब) जळीत कांड
क) वासनाकांड  ड) थोतांड

**९)** भोवरा ही ——— यांची नाट्यकृती आहे.
अ) मधुकर तोरडमल  ब) हेमंत एदलाबादकर
क) महेश एलकुंचवार  ड) विल्यम शेक्सपियर

**१०)** ——— ही आळेकरांची नाट्यकृती आहे.
अ) महापुरूष  ब) शनिवार रविवार
क) बडीबेगम  ड) सर्वदूर

**११)** मेला तो देशपांडे हे ——— यांचे प्रसिद्ध नाटक आहे.
अ) जयंत पवार  ब) मधुकर तोरडमल
क) महेश एलकुंचवार  ड) सतीश आळेकर

**१२)** चाणक्य विष्णूगुप्त या नाट्यकृतीचे लेखक ———.
अ) विजय तेंडुलकर  ब) विष्णू वामन शिरवाडकर
क) गो. पु. देशपांडे  ड) आचार्य अत्रे

**प्र.२ टीपा लिहा (कोणत्याही चार)** १२
**अ)** मिकी आणि मेमसाब
**ब)** उध्वस्त धर्मशाळा
**क)** वंश
**ड)** सुलतान
**इ)** ठकीशी संवाद
**ई)** टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन मधील पात्र रचना

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२
**अ)** शं. ना. नवरे यांच्या नाटकातील समस्या सुत्रण याविषयी लिहा.
**ब)** मराठी प्रायोगिक रंगभूमी समोरील आव्हाने स्पष्ट करा.
**क)** महेश एलकुंचवार यांच्या लेखन शैली विषयी लिहा.
**ड)** नाटककार गो. पु. देशपांडे यांच्या नाट्य शैलीतील वेगळेपण सिद्ध करा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२
**अ)** जयंत पवार यांच्या नाट्यत्रयी विषयी लिहा.

**किंवा**

**ब)** नाटककार मधुकर तोरडमल यांच्या नाटकांविषयी लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

सतिश आळेकर यांच्या नाट्यसृष्टीचा आढावा घ्या.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र – IV) (नवीन) (NEP CBCS) परीक्षाः**
**ऑक्टोबर/नोव्हेंबर – २०२५**
**Indian Play writes (230124401)**

वार, दिनांक : मंगळवार, २८-१०-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१२**

**१)** प्रसिद्ध भारतीय नाटककार प्रेमचंद ह्यांच्या लेखन परंपरेतील लिखाण म्हणून ––– ह्यांच्या लिखाणाला मान्यता आहे.
अ) भीष्म साहनी ब) तापसी सेन
क) आर्य पल्लव ड) तापस सेन

**२)** कालिदास हे मोहन राकेश यांच्या नाटकातील ––– आहेत.
अ) प्रेरणा ब) कलाकार
क) आत्मा ड) पात्र

**३)** ––– हा मोहन राकेश यांच्या नाटकांचा आत्मा आहे.
अ) निराशावाद ब) अस्तित्ववाद
क) साफल्यवाद ड) समाजवाद

**४)** पोपटपंची या नाटकाचे लेखक –––.
अ) पु. ल. देशपांडे ब) शफाअत खान
क) विजय तेंडुलकर ड) सतीश आळेकर

**५)** 'कर्पुर मंजिरी' या प्राकृत नाटकाचे भाषांतर यांनी केले.
अ) मोहन राकेश ब) गिरीश कर्नाड
क) जयशंकर प्रसाद ड) भारतेंदु हरिश्चंद्र

**६)** 'करूणालय' हे ––– आहे.
अ) प्रकाशित काव्य संग्रह ब) काव्य नाट्य संग्रह
क) अप्रकाशित काव्य संग्रह ड) नृत्य काव्य संग्रह

**७)** जयशंकर प्रसाद यांना लिखाणाच्या ––– युगातील प्रमुख समजले जाते.
अ) मायावादी ब) परकायावादी
क) छायावादी ड) कायावादी

८) गिरीष कर्नाड ह्यांची बहुतांश नाटके ——— ह्यांनी मराठी मध्ये भाषांतरीत केली.

अ) सारंग देशपांडे ब) सरोज देशपांडे
क) सलोनी देशपांडे ड) सुलभा देशपांडे

९) 'टिपू सुल्तानचे स्वप्न' हे नाटक कुणी लिहीले?

अ) जयशंकर प्रसाद ब) प्र. के. अत्रे
क) गिरीश कर्नाड ड) मोहन राकेश

१०) जाती व्यवस्था आणि धर्म व्यवस्था यांना विरोध करणारे नाटक ———.

अ) तलेदण्ड ब) खुर्ची का मिरची
क) घाशीराम कोतवाल ड) तो मी नव्हेच

११) राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतून बाद ठरविण्यात आलेले नाटक ———.

अ) मादी ब) पुरूष
क) शांतता! कोर्ट चालू आहे ड) सखाराम बाईंडर

१२) शिक्षण पद्धती वर भाष्य करणारे नाटक ———.

अ) पाहिजे जातीचे ब) श्यामची आई
क) संगीत शिक्षणाची ऐशीतैशी ड) झेंडूची फुले

**प्र.२ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १२

**अ)** भारतेंदू हरिश्चंद्र ह्यांच्या साहित्यिक योगदानबद्दल लिहा.
**ब)** महानिर्वाण नाटकातील पात्ररचनेचे वैशिष्ट्य सांगा.
**क)** 'अंधेर नगरी' नाटकातील संघर्ष यावर टिपणी लिहा.
**ड)** मोहन राकेश ह्यांच्या लिखाणाविषयी चर्चा करा.
**इ)** पाहिजे जातीचे नाटकातील पात्रांचे मनोविश्लेषण करा.
**ई)** भीष्म साहनी ह्यांच्या लेखन कार्याचा आढावा घ्या.

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १२

**अ)** आधे अधुरे ह्या नाटकाच्या नाट्यांशाविषयी चर्चा करा.
**ब)** बेगम बर्वे नाटकाचे विवेचन करा.
**क)** जयशंकर प्रसाद यांच्या नाटकांविषयी चर्चा करा.
**ड)** नागमंडलम ह्या नाटकाच्या नाट्यांशाविषयी चर्चा करा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १२

**अ)** गिरीष कर्नाड यांच्या नाट्य लेखन शैलीचे विस्तृत विवेचन करा.
**ब)** भारतेंदु हरिश्चंद्र ह्यांच्या नाट्यलिखाणाचा आढावा घ्या.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १२

भारतीय रंगभूमी वरील कालानुरूप झालेल्या बदलांविषयी सविस्तर चर्चा करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र – IV) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Stage Craft & Theatre Techniques (230124402)**

वार, दिनांक : गुरूवार, ३०-१०-२०२५ कमाल गुण: ६०
वेळ: दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

**१)** कमीत कमी साधनांचा उपयोग करून जास्तीत जास्त परिणाम साधणे म्हणजे ––– दृश्यबंध होय.
अ) एकक दृश्यबंध ब) द्विमुख दृश्यबंध
क) त्रीपार्श्व दृश्यबंध ड) अल्पतम दृश्यबंध

**२)** नाट्यगृहांचे एकूण ––– प्रकार पडतात.
अ) २ ब) ४
क) ३ ड) ५

**३)** परीच्या वेशभूषेत पांढरा किंवा ––– हा रंग व तिरप्या रेषेचा वापर करतात.
अ) लाल ब) निळा
क) पिवळा ड) आकाशी

**४)** तांबडा व हिरवा रंग समप्रमाणात मिसळले की ––– प्रकाश तयार होतो.
अ) पिवळा ब) हिरवा
क) नारंगी ड) गुलाबी

**५)** दृश्यबंधाचे घटक म्हणून ज्या वस्तूंचा उपयोग होतो त्यांना ––– म्हणतात.
अ) दृश्यवस्तू ब) देखाव्याच्या वस्तू
क) हस्तवस्तू ड) नाटयवस्तू

**६)** विद्युतप्रवाह ––– असतो.
अ) द्विमार्गी ब) एकमार्गी
क) समप्रमाणात ड) त्रिमार्गी

**७)** अम्बर किंवा काळया रंगाच्या रेषांनी चेहऱ्यावर ––– आभास निर्माण करता येतो.
अ) सुरकुत्या ब) हास्य
क) राग ड) शांतता

८) भरतमुनिंच्या मते ——— हे नाटयगृह आकारमानाच्या दृष्टीने श्रेष्ठ नाटयगृह होय.
   अ) त्रस्त नाटयगृह  ब) चतुरस्त्र नाटयगृह
   क) विकृष्ट मध्यम नाटयगृह  ड) यापैकी नाही

९) शृंगार रसाला ——— हा रंग पोषक ठरतो.
   अ) गुलाबी  ब) आकाशी
   क) फिकट मोरपंखी  ड) नारंगी

१०) वायु प्रकाशाचा उपयोग ——— सालापर्यंत रंगमंचावर होत असे.
   अ) १८७९  ब) १८९६
   क) १८५६  ड) १८७५

११) ——— रंगभूमीवर पूर्वी जल रंगांचा उपयोग होत होता.
   अ) मराठी  ब) ग्रीक
   क) रोमन  ड) अमेरिकन

१२) मंदकाचे एकूण ——— प्रकार पडतात.
   अ) २  ब) ४
   क) ३  ड) ५

**प्र.२ टिपा लिहा (कोणत्याही चार)** **१२**

**अ)** कृष्णदीप
**ब)** वेशभूषा आयोजनासाठीची भौगोलिक वैशिष्टये
**क)** दृश्यबंध आयोजन – समांतर रेषा
**ड)** वांशिक भिन्नतेनुसार चेहऱ्याचे पडणारे प्रकार
**इ)** ढगांचा गडगडाट व वीज कडाडल्याचा आवाज
**ई)** नाकाच्या विविध प्रकारांसाठी केल्या जाणाऱ्या वेशभूषेची तीन उदाहरणे

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **१२**

**अ)** चतुरस्त्र नाटयगृहाची माहिती आकृतीसह सविस्तरपणे वर्णन करा.
**ब)** मंदकाच्या प्रकारापैकी अवरोध मंदक हा प्रकार स्पष्ट करा.
**क)** त्रीपरिमित रंगभूषा म्हणजे काय?
**ड)** रंगीत प्रकाशाचा रंगभूषेवरील परिणाम स्पष्ट करा.

**प्र.४ सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** **१२**

**अ)** वेशभूषा आयोजकाची कार्यपद्धती विविध मुद्दयानुसार सविस्तरपणे मांडा.

**किंवा**

**ब)** प्रकाश आयोजनाच्या दृष्टीने आवश्यक असणारे प्रकाशाचे गुणधर्म सविस्तरपणे लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १२

ध्वनी व पार्श्व संगीताचे नाटयनिर्मितीतील महत्त्व सांगून पार्श्वभूमी परिणामांच्या कोणत्याही सहा पद्धती सविस्तरपणे मांडा.

| Seat No. | |
|---|---|

Set P

**एम.ए. (Dramatics) (सत्र - IV) (नवीन) (NEP CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Theatre Criticism (230124405)**

वार, दिनांकः शनिवार, ०१-११-२०२५ कमाल गुणः ६०
वेळः दुपारी ०३:०० ते ०५:३०

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १२

१) विशिष्ट प्रयोगाचा जनमानसावर झालेला संस्कार वर्णन करणारी समीक्षा म्हणजे ———.
अ) नाट्य समीक्षा ब) व्यक्ती समीक्षा
क) प्रयोग समीक्षा ड) संस्कार समीक्षा

२) एकाच नाट्यसंहितेच्या ——— म्हणजे तौलनिक प्रयोग समीक्षा.
अ) विविध दिग्दर्शकांनी केलेल्या प्रयोगाची समीक्षा
ब) विविध समीक्षकांनी केलेल्या प्रयोगाची समीक्षा
क) विविध तंत्रज्ञानी केलेल्या तंत्रांची समीक्षा
ड) विविध प्रेक्षकांनी केलेल्या प्रयोगाची समीक्षा

३) एका विशिष्ट कालखंडातील नाट्यप्रयोगांच्या घडामोडींचा आलेख मांडणारी समीक्षा म्हणजे ———.
अ) कालखंडीय समीक्षा ब) ऐतिहासिक संशोधनात्मक समीक्षा
क) भौगोलिक समीक्षा ड) उत्तर समीक्षा

४) केवळ प्रयोगांची समीक्षा करणे एवढीच समीक्षकाची जबाबदारी नसून ——— हे सुद्धा कर्तव्य आहे.
अ) चित्रपटांचे समीक्षण करणे
ब) प्रेक्षकांचे प्रबोधन करणे
क) प्रेक्षकांचे मनोरंजन करणे
ड) नाट्यगृहाबाहेरील नाट्यचळवळींच्या समस्यांची जाणीव असणे व त्यावर भाष्य करणे

५) विविध स्तरावरील समीक्षणे प्रकाशित होण्यासाठी ———.
   अ) वर्तमानपत्रे लागतात
   ब) त्या तोलामोलाची व्यासपीठे लागतात
   क) प्रकाशक लागतात
   ड) वाचक लागतात

६) नाट्य प्रयोगाचा अनुभव प्रेक्षकांसाठी ——— अशा स्वरूपाचा असतो.
   अ) तेव्हा आणि तिथे    ब) केव्हा आणि कुठे
   क) आत्ता आणि इथे    ड) जेव्हा आणि जिथे

७) सध्याचे बहुतांश नाट्यसमीक्षण हे ——— आढळते.
   अ) केवळ कथानक सांगणारे    ब) केवळ टीका करणारे
   क) केवळ कौतुक करणारे    ड) केवळ प्रसिद्धी देणारे

८) समीक्षण ही ——— आहे.
   अ) संधी    ब) जबाबदारी
   क) कला    ड) अधिकार

९) नाट्यसमीक्षक हा नाटकाचा ——— नसतो.
   अ) परिक्षक    ब) प्रेक्षक
   क) मित्र    ड) यापैकी नाही

१०) नाट्यसृष्टीच्या सद्यस्थितीबरोबरच ——— अभ्यास असणे समीक्षकासाठी बंधनकारक बाब आहे.
   अ) भूतकाळाचा    ब) इतिहासाचा
   क) वैभावाचा    ड) उगमाचा

११) सततचे वाचन आणि निरनिराळया प्रयोगांचा अभ्यास हे उत्तम ———————— बनण्यासाठी आवश्यक आहे.
   अ) नट    ब) दिग्दर्शक
   क) समीक्षक    ड) प्रेक्षक

१२) संगीत नाटकातील गद्य संवादांचे लेखन आणि उच्चारण ——— असते.
   अ) सारखेच    ब) निरनिराळे
   क) कमी अधिक    ड) सांगितीक

**प्र.२ टिपा लिहा. (कोणत्याही चार)** **१२**

**अ)** ती फुलराणी नाटकाची समीक्षा
**ब)** क्रिटिक क्लब
**क)** नाटकाच्या श्राव्य अनुभवाचे समीक्षण
**ड)** साहित्य समीक्षा

**इ)** संशोधनात्मक समीक्षा
**ई)** ऐतिहासिक समीक्षा

**प्र.३ दीर्घोत्तरी प्रश्न. (कोणतेही दोन)** १२
**अ)** समीक्षेचे प्रकार सांगून त्यांची उपयोगिता सिद्ध करा.
**ब)** समीक्षणाची पूर्वतयारी स्पष्ट करा.
**क)** मकरंद साठे यांचे समीक्षण क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.
**ड)** स्वातंत्र्योत्तर काळातील रंगभूमीचे समीक्षण करा.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १२
**अ)** समीक्षकांची जबाबदारी यावर विस्तृत लिहा.
**ब)** आजच्या मराठी रंगभूमीचे समीक्षण करा.

**प्र.५ विस्तृत उत्तर लिहा.** १२
'शांतता कोर्ट चालू आहे' नाट्यप्रयोगाचे समीक्षण करा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र – IV) (नवीन / जुना) (CBCS) परीक्षाः**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Modern Indian Theatre (MA22401)**

वार, दिनांक : मंगळवार, २८-१०-२०२५ — कमाल गुणः ८०
वेळः दुपारी ०३:०० ते ०६:००

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१६**

**१)** पोपटपंची या नाटकाचे लेखक –––.
अ) पु. ल. देशपांडे  ब) सतीश आळेकर
क) विजय तेंडुलकर  ड) शफाअत खान

**२)** 'कर्पुर मंजिरी' या प्राकृत नाटकाचे भाषांतर यांनी केले.
अ) मोहन राकेश  ब) भारतेंदु हरिश्चंद्र
क) जयशंकर प्रसाद  ड) गिरीश कर्नाड

**३)** 'करूणालय' हे ––– आहे.
अ) प्रकाशित काव्य  ब) नृत्य काव्य
क) अप्रकाशित काव्य  ड) काव्य नाट्य

**४)** जयशंकर प्रसाद यांना लिखाणाच्या ––– युगातील प्रमुख समजले जाते.
अ) मायावादी  ब) कायावादी
क) छायावादी  ड) परकायावादी

**५)** गिरीश कर्नाड ह्यांची बहुतांश नाटके ––– ह्यांनी मराठीमध्ये भाषांतरीत केली.
अ) सारंग देशपांडे  ब) सुलभा देशपांडे
क) सलोनी देशपांडे  ड) सरोज देशपांडे

**६)** 'टिपू सुल्तानचे स्वप्न' हे नाटक कुणी लिहीले?
अ) जयशंकर प्रसाद  ब) मोहन राकेश
क) गिरीश कर्नाड  ड) प्र. के. अत्रे

**७)** जाती व्यवस्था आणि धर्म व्यवस्था यांना विरोध करणारे नाटक –––.
अ) तलेदण्ड  ब) तो मी नव्हेच
क) घाशीराम कोतवाल  ड) खुर्ची का मिरची

८) राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतून बाद ठरविण्यात आलेले नाटक –––.
अ) मादी ब) सखाराम बाईंडर
क) शांतता! कोर्ट चालू आहे ड) पुरूष

९) शिक्षण प्रणाली वर थेट भाष्य करणारे नाटक –––.
अ) पाहिजे जातीचे ब) झेंडूची फुले
क) संगीत शिक्षणाची ऐशीतैशी ड) श्यामची आई

१०) ''हजारो लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी माणसे आज समाजात आहेत. त्यांचे मारेकरी होण्यास मला आवडेल.'' असे कोण म्हणाले?
अ) विजय तेंडुलकर ब) जयदेव हट्टंगडी
क) गिरीश कर्नाड ड) प्रबोधनकार ठाकरे

११) 'उजाडलं... पण सूर्य कुठे आहे?' ह्या नाटकाचे व्यावसायिक रंगभूमीवरचे नाव –––.
अ) लाल सलाम ब) शोभायात्रा
क) वारणेचा वाघ ड) अंधारात मठ्ठ काळा बैल

१२) प्रहसनाला व्यावसायिक रंगभूमीवर गांभीर्याने आणणारे लेखक –––.
अ) विजया मेहता ब) दादा कोंडके
क) शफाअत खान ड) केदार शिंदे

१३) जयशंकर प्रसाद ह्यांचे पहिले राजकीय नाटक –––.
अ) राज्य ब) राजा
क) श्रीराज्य ड) राजश्री

१४) रक्त कल्याण हे ––– नाटक आहे.
अ) रूपांतरित ब) प्रतिकात्मक
क) भाषांतर ड) संयुक्तिक

१५) अनुस्वार, निक्षेप आणि अनुनासिक ही ––– आहेत.
अ) चिन्हे ब) चित्रे
क) व्याकरणातील चिन्हे ड) पात्रे

१६) छायावादी कवी–लेखक म्हणून ––– यांना ओळखले जाते.
अ) जयशंकर प्रसाद ब) पार्वतीनंदन त्रिपाठी
क) हरिवंशराय बच्चन ड) गिरीश कर्नाड

**प्र.२ टिपा लिहा. (कोणतेही चार)** १६

**अ)** भूमितीचा फार्स
**ब)** एक दिवस मठाकडे
**क)** पाहिजे जातीचे
**ड)** हयवदन
**इ)** कबीरा खड़ा बजार में
**ई)** घाशीराम कोतवाल

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १६

**अ)** महापूर नाटकातील व्यक्तिरेखांचा अभ्यास मांडा.
**ब)** भिष्म साहनी ह्यांच्या लेखन कार्याचा आढावा घ्या.
**क)** जयशंकर प्रसाद ह्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये लिहा.
**ड)** आधे अधुरे नाटकाच्या कथानक रचनेतील वेगळेपण लिहा.

**प्र.४ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** १६

**अ)** भारतेंदु हरिश्चंद्र ह्यांची नाट्यसृष्टी विशद करा.

**किंवा**

**ब)** तेंडुलकरांच्या 'शांतता! कोर्ट चालू आहे' नाटकाचे विवेचन करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १६

सतिश आळेकरांच्या नाट्य लेखन शैली विषयी लिहा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

# एम.ए. (Dramatics) (सत्र – IV) (नवीन / जुना) (CBCS) परीक्षा: ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५
# Theatre Techniques (MA22402)

वार, दिनांक : गुरूवार, ३०-१०-२०२५ कमाल गुण: ८०
वेळ: दुपारी ०३:०० ते ०६:००

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** १६

१) हिरव्या व ––– प्रकाश रंगाच्या मिश्रणाने मोरपंखी प्रकाश होतो.
अ) पांढऱ्या ब) काळ्या
क) जांभळ्या ड) निळ्या

२) फ्रेनेल भिंग वापरलेल्या ––– ला फ्रेनेलाईट अथवा फ्रेनेल स्पॉट म्हणतात.
अ) पुंजदिप ब) डिमर
क) पेट्रोमॅक्स ड) मंदक

३) विद्युतप्रवाह हा ––– असतो.
अ) एकमार्गी ब) द्विमार्गी
क) तीनमार्गी ड) आठमार्गी

४) ––– हे देखाव्याच्या वस्तूचे एक उदाहरण आहे.
अ) पतंग ब) हिमवर्षाव
क) ओहम ड) चंचलता

५) विद्युत उपकरणांची जोडणी करण्याच्या एकूण ––– पद्धती आहेत.
अ) एक ब) दोन
क) पाच ड) सहा

६) विद्युत अवरोध तारेच्या ––– च्या समप्रमाणात असतो.
अ) रूंदी ब) उंची
क) लांबी ड) यापैकी नाही

७) डोक्यावर बसवायचे विविध केशरचनेचे किंवा टक्कलांचे टोप, क्रेप, दाढीमिशी ही ––– रंगभूषेची उदाहरणे आहेत.
अ) आभासी ब) रेषारूप
क) त्रिपरिमीत ड) यापैकी नाही

८) ॲम्बर किंवा ––– प्रकाशामुळे चेहऱ्यावरील लाली फिकी पडते.
अ) हिरव्या
ब) लाल
क) निळ्या
ड) नारंगी

९) रंगभूषेपूर्वी कमीत कमी ––– तास आधी नटाने दाढी करावी.
अ) पाच
ब) चार
क) एक
ड) दोन

१०) एका कोपऱ्यावर बसविलेल्या कण्याभोवती फिरू शकणारा सरकता रंगमंच म्हणजे ––– होय.
अ) जॅक नाईफ मंच
ब) सरकता मंच
क) स्थिर मंच
ड) यापैकी नाही

११) दृश्यरचनेत सामान्यता रेषांचे ––– प्रकार पडतात.
अ) एक
ब) तीन
क) पाच
ड) सात

१२) ––– ही विद्युत उपकरणांची जोडणी करण्याची एक पद्धत आहे.
अ) समांतर जोडणी
ब) असमांतर जोडणी
क) विभक्त जोडणी
ड) द्वितीय जोडणी

१३) कपाळावरच्या केशरचनेपासून भूवयांपर्यंतचा आडवा पट्टा म्हणजे ––– होय.
अ) कपाळ कटिबंध
ब) मूख कटिबंध
क) नासिका कटिबंध
ड) डाव्या डोळ्याचा कटिबंध

१४) विद्युतशक्ती मोजण्याचे ––– हे माप आहे.
अ) ओहम
ब) डिमर
क) मंदक
ड) वॉट

१५) डाव्या डोळ्याच्या बाहेरच्या कोपऱ्यापासून डाव्या कानापर्यंतचा उभा पट्टा म्हणजे ––– होय.
अ) उजव्या गालाचा कटिबंध
ब) डाव्या गालाचा कटिबंध
क) उजव्या डोळ्याचा कटिबंध
ड) उजव्या कानाचा कटिबंध

१६) रंगमंचावर प्रेक्षकांना दिसणार नाही अशा पद्धतीने पेटती शेगडी ठेवून त्यात धूप टाकून ––– चा परिणाम दाखविता येतो.
अ) वाऱ्याचा
ब) आगीचा
क) धुराचा
ड) पाण्याचा

**प्र.२ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** १६

**अ)** प्रकाशाचे पृथ्थकरण म्हणजे काय?

**ब)** नाटकासाठी वेशभूषा आयोजन करताना कोणत्या भौगोलिक घटकांचा विचार करावा लागतो?

**क)** गगणिका प्रकाशन भूमिदिप म्हणजे काय?

**ड)** पात्रांचे रंगमंचावर वास्तव स्वरूपात दर्शन होण्यासाठी कोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो?

**इ)** रंगभूषेसाठी आवश्यक असणारे आडवे पट्टे (कटिबंध) स्पष्ट करा.

**ई)** वांशिक भिन्नतेनुसार चेहऱ्याचे कोणते आकार आढळतात?

**प्र.३ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १६

**अ)** नाटकात मनोवैज्ञानिक परिणाम कसे साधले जातात, स्पष्ट करा.

**ब)** आभासी रंगभूषा म्हणजे काय?

**क)** प्रकाशाचे परावर्तन म्हणजे काय?

**ड)** प्रकाशसाधनापासून रंगीत प्रकाश हवा असल्यास कोणत्या तीन रंगीत माध्यमांचा उपयोग केला जातो?

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १६

**अ)** चेहऱ्याची मांडणी व रचना सांगून आडवे समांतर कटिबंध व उभे समांतर कटिबंध सविस्तरपणे स्पष्ट करा.

**ब)** प्रकाश आयोजकाची कार्यपद्धती सविस्तरपणे वर्णन करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** १६

वेशभूषा आयोजकाचे नाट्यनिर्मितीतील वेशभूषेचे महत्त्व व कार्य सविस्तरपणे मांडा.

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

**एम.ए. (Dramatics) (सत्र - IV) (नवीन / जुना) (CBCS) परीक्षा:**
**ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५**
**Essay Writing - III (MA22407)**

वार, दिनांकः शनिवार, ०१-११-२०२५ कमाल गुणः ८०
वेळः दुपारी ०३:०० ते ०६:००

**सूचना :** १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **१६**

१) भारतीय नाटकांचा उगम ––– अवती भवती झालेला आहे.
अ) गीतांच्या ब) धार्मिक विधींच्या
क) संगीताच्या ड) मानवी मनाच्या

२) ––– अभिनयाच्या मानसतंत्रातील महत्त्वाचा मुद्दा आहे.
अ) जादूई जर ब) जादूई बरं
क) जादूई तर ड) जादूई खरं

३) ब्रेख्तचे भारतीय रंगभूमी वर गाजलेले ––– हे महत्वाचे नाटक आहे.
अ) फ्री ओपेरा ब) थ्री पेनी ओपेरा
क) थ्री सेंट ओपेरा ड) फोर पेनी म्युज़िक

४) आवेध्य, बंधनीय, आक्षेप्य आणि आरोप्यक हे ––– प्रकार आहेत.
अ) नाट्य संहितांचे ब) प्रेक्षकांचे
क) अलंकारांचे ड) नाटकांचे

५) पतीचे मन दुसऱ्या स्त्रीकडे गेले असल्याने तो जर शयन मंदिरात आला नाही, तर विषण्ण होऊन बसणाऱ्या स्त्रीला ––– म्हणतात.
अ) खण्डिता ब) विप्रलब्धा
क) अभिसारीका ड) स्वाधीनभर्तृका

६) निंदायुक्त वचन बोलणे म्हणजे –––.
अ) भाषण ब) परिभाषण
क) संवाद ड) परिसंवाद

७) माय लाईफ इन आर्ट हे ––– आत्मचरित्र आहे.
अ) स्टॅनिस्लावस्कीचे ब) मेयरहोल्ड्चे
क) ब्रेख्तचे ड) शेक्सपिअरचे

८) नाट्यशास्त्राप्रमाणे शाब्दिक व्यापार जास्त असणारे ––– हे रूपक होय.
अ) इहामृग
ब) समावकार
क) प्रहसन
ड) डीम

९) प्रत्याहारानंतर सर्व गायकांनी मिळून एकदम सातही स्वर आरोह आणि अवरोह म्हणणे म्हणजे –––.
अ) उद्गार
ब) गायन
क) समुहगीत
ड) अवतरण

१०) ––– यांना स्टॅनिस्लावस्कीचे थिएटर मधील एकमेव वारस मानले जाते.
अ) ब्रेख्त
ब) मेयरहोल्ड
क) कॉन्स्टॅन्टीन
ड) ग्रोटोवस्की

११) भूतकालीनत्वावर भर देत केलेला नाट्याविष्कार म्हणजे –––.
अ) हिस्टॉरीफिकेशन
ब) प्रेसेंटेशन
क) कॉमेडी
ड) एलिएनेशन

१२) महाकाव्य रंगभूमीच्या प्रेक्षकांना ते पहात असलेले नाटक प्रतिक्षणी ––– वाटते.
अ) करमणूकच
ब) खोटेच
क) नाटकच
ड) गंभीरच

१३) पुष्कळ सांगितलेल्या गोष्टींच्या अर्थातून एकच अर्थ निश्चितपणे सिद्ध करून दाखवणारे वाक्य म्हणजे –––.
अ) कारण
ब) पुरस्सर
क) कथा
ड) हेतू

१४) आपल्या माणसाला दुसऱ्याची उदाहरणे देऊन कठोर बोलणे म्हणजे –––.
अ) आक्रंद
ब) ताडन
क) विलाप
ड) हरण

१५) काव्यातील एखाद्या शब्दावरून विशेषप्रकारचा जो अर्थ विद्वानांच्या ध्यानात येतो त्या शब्दाला ––– गुण म्हणतात.
अ) सार्थ
ब) एकल
क) समाधी
ड) शब्दकला

१६) ज्या काव्यातील छंद आणि संधी सोप्या पद्धतीने आणि अर्थ नाजूक पद्धतीने सांगितलेला असतो त्यास ––– काव्य म्हणतात.
अ) कुमार
ब) बाल
क) सुकुमार
ड) सुमार

**प्र.२ टिपा लिहा (कोणत्याही चार)** १६

**अ)** भाव – विभाव
**ब)** नायक
**क)** भावस्मृती
**ड)** त्रयस्थ भाव
**इ)** जादूई जर
**ई)** मदर करेज

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** १६

**अ)** नाट्यशास्त्रातील नायिका भेद स्पष्ट करा.
**ब)** ब्रेख्तच्या कोणत्याही दोन नाटकांचे विश्लेषण करा.
**क)** दशरूपक विधान स्पष्ट करा.
**ड)** तटस्थता भाव म्हणजे काय ते सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा. (कोणताही एक)** १६

**अ)** स्टॅनिस्लावस्की यांनी सांगितलेली मनोविश्लेषणात्मक पद्धत विशद करा.

**किंवा**

**ब)** बर्तोल्त ब्रेख्त यांच्या महाकाव्य रंगभूमी विषयी लिहा.

**प्र.५ सविस्तर उत्तर लिहा.** १६

भरतमुनी प्रणीत रस सिद्धांताचे विवेचन करा.